MHND240008032022

दिवाणी किरकोळ अर्ज. क्र. ६७/२०२२

## निशाणी १३ खालील आदेश

१. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्ज त्याच्याविरुध्द झालेला विनाम्हणणे आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादीने सदरचे प्रकरण सह दिवाणी न्यायालय येथे वर्ग करणे करीता अर्ज दिला होता. त्यामुळे सदर प्रकरणात अर्जाचा जबाब देवू शकले नाहीत. त्यामागे अर्जदाराचा कोणताही गैर हेतू नव्हता त्यांच्याविरुद्ध झालेला विनाम्हणणे आदेश रद्द होऊन म्हणणे अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळावी ही विनंती.

३. या उलट, अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदाराने जाणीवपूर्वक व खोडसाळपणाने उशिराने जबाब दाखल केला आहे. अर्जामध्ये कोणतेही सबळ व न्यायाला पटेल असे कारण दाखवण्यात आलेले नाही. केवळ अर्जदारांना त्रास देण्याचे हेतूने उशिराने व सवलतीने सदरचा अर्ज करण्यात आला आहे. गैरअर्जदारांना दि. ०३.०८.२०२२ रोजी समन्स तामील झाले आहेत व प्रकरण चालू आहे याची पुर्ण जाणीव आहे तरीही सदर अर्जाचा जबाब मुदतीमध्ये दाखल करण्यात आला नाही करीता गैरअर्जदारांचा अर्ज मंजूर केल्यास तो रुपये १००००/– खर्चासह मंजूर करण्यात यावा.

४. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५.		न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा अर्ज हा तात्पुरत्या मनाई हुकुम आदेशाचे उलंघन केले म्हणून दाखल केला आहे. गैरअर्जदाराच्या कथनाप्रमाणे सदरील प्रकरण सह दिवाणी न्यायालयात वर्ग करण्याकरीता अर्ज दिला होता म्हणून ते म्हणणे दाखल करु शकले नाही. त्यामुळे गैरअर्जदार विरुद्ध विनाम्हणणे आदेश पारित झाला आहे. परंतू अर्जदाराने सदर कथनास विरोध केला आहे. अर्जदार यांनी दिलेले कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतू गैरअर्जदार यांना त्यांचे म्हणणे देऊन त्यांची बाजु मांडण्याची संधी मिळावी व दावा गुणवत्तेवर निकाली काढता यावा, याकरिता, गैरअर्जदारास संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. तसेच न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. मात्र गैरअर्जदार यांनी केलेल्या विलंबामुळे अर्जदाराला जो असोयीस्करपणा झाला, त्याकरीता गैरअर्जदार यांना खर्च लावणे योग्य व संयुक्तिक आहे. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१.	सदरचा अर्ज गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना रक्कम रु. ४००/- देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.
२.	गैरअर्जदार विरुद्ध झालेला विनाम्हणणे आदेश रद्द करण्यात येतो व म्हणणे दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

(श्रीमती ए. टी. गित्ते)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नायगाव

दि. ०५.०७.२०२३.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Chikhale J.G. |
| Court | - | Court of Civil Judge, Jr. Div. & J.M.F.C., Naigaion. |
| Date of order/judgment signed by presiding officer. | - | 05.07.2023 |
| Judgment/Order uploaded on | - | 05.07.2023 |